शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर
Email Id : ssazppalghar@gmail.com edu.palghar@gmail.com

# नमुना दोन

ई-मेल :-Edu.palghar@gmail.com फॅक्स :-

जावक क्र. :- जा.क्र/पाजिप/शिक्षण/प्राथ/वशी/ १०६६/२०२३
शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद पालघर
दिनांक:- २० / १२ /२०२३

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय:- शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, पालघर
(जिल्हा/राज्य यांचे नाव:-) जिल्हा पालघर (महाराष्ट्र)

मुख्याध्यापः- दीप एज्युकेशन सोसायटी संचलीत दीप ग्लोबल स्कुल सी. बि. एस. सी., सरावली, बोईसर ता. जि. पालघर

**विषय :-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...

आपल्या दि. १४/०७/२०२३ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) दिनांक ०१/०४/२०२२ पासून दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इ. ५वी ते इ. ८ वी इंग्रजी माध्यम, (CBSE), दीप एज्युकेशन सोसायटी संचलाइत दीप ग्लोबल सककुल सी. बि. एस. सी., सरावली, बोईसर ता. जि. पालघर या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

- मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
- बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
- शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
- परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
- संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणर नाही.
- कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी., धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
- शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
- शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
- शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणी वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-
  - शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ४५०० चौ.मी

शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

Email Id : ssazppalghar@gmail.com edu.palghar@gmail.com

- एकुण बांधकाम क्षेत्र :- ७५० चौ.मी
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- ८०० चौ.मी
- वर्गखोल्यांची संख्या :- १०
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- ०२
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. :- मुलासाठी :- ०५
  मुलीसाठी :- ०५
- पिण्याच्या पाण्याची सुविधा:- नळ
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- आहे
- अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:- आहे.

- मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र,चालविता येणार नाहीत.
- शाळेची इमारत किंवा इतर बाधकात किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
- शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
- शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
- शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.
- तुमच्या शाळेला मिळोलल्या संकेतांक PALGHAR/PALGHAR/ENG/SEL/ ५५ /२०२३ असा आहे, हया या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
- शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
- संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.
- जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
- आपल्या शाळेस दिलेली पुनर्मान्यता ही आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार व गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पालघर यांनी केलेल्या शिफारसीच्या अधीन राहून देण्यात येत आहे. प्रस्तावात सादर केलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास आपणास दिलेली पुनर्मान्यता रदद करण्यात येईल व आपणा विरुध्द चुकीची माहिती दिल्याबद्दल फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

(शेषराव बडे)

शिक्षणाधिकारी (प्राथ.)

जिल्हा परिषद पालघर